




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८५ वा | मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# भीमाशंकरच्या जंगलावर कुऱ्हाड; विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी ?

# टोरंट पॉवर प्रकल्पासाठी झाडे तोडण्याच्या चर्चेने पर्यावरणप्रेमी संतप्त

**भीमाशंकर (कटूसत्य वृत्त):-** विकासाच्या नावाखाली निसर्गाचा किती बळी द्यायचा, असा संतप्त सवाल आता भीमाशंकर परिसरातील जंगलतोडीच्या मुद्द्यावरून उपस्थित होत आहे. टोरंट पॉवरच्या ऊर्जा प्रकल्पासाठी तब्बल ३२ हजार झाडे तोडली जाणार असल्याच्या चर्चेमुळे ग्रामस्थ, पर्यावरणप्रेमी आणि निसर्गप्रेमी नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. जंगल, डोंगररांगा, वन्यजीवांचा अधिवास आणि नैसर्गिक जलस्रोतांवर या प्रकल्पाचा काय परिणाम होणार, याबाबत स्पष्ट माहिती देण्याची मागणी होत आहे. दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणातील आरोपांना ह्यफेक नॅरेटिव्हह्ण असे संबोधत संबंधित प्रकल्प स्वच्छ ऊर्जेशी निगडित असल्याची भूमिका मांडली आहे. त्यामुळे विकासाची गरज आणि पर्यावरणाचे संरक्षण यांच्यातील संघर्ष पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

**झाडे तोडण्याचा आकडा मोठा; नेमकी वस्तुस्थिती काय ?**

भीमाशंकर परिसरातील प्रस्तावित प्रकल्पासाठी ३२ हजार झाडे तोडली जाणार असल्याचा दावा चर्चेत आहे. या वृक्षतोडीचे नेमके क्षेत्र, झाडांची संख्या, वनजमिनीचे स्वरूप, आवश्यक परवानग्या आणि पर्यावरणीय परिणाम याबाबत अधिकृत व तपशीलवार माहिती सार्वजनिक होणे गरजेचे आहे. काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाल्याचे दाखवणारे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

मात्र, वन विभागाच्या भूमिकेनुसार अभयारण्याच्या हद्दीत बेकायदेशीर वृक्षतोड होत नसून, वाद अभयारण्यालगतच्या वनक्षेत्राशी संबंधित आहे. त्यामुळे नेमकी वृक्षतोड कुठे होत आहे, संबंधित जमीन कोणत्या वर्गवारीत येते आणि किती झाडे तोडण्यास परवानगी देण्यात आली आहे, याची अधिकृत कागदपत्रांसह स्पष्टता येणे आवश्यक आहे. आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन वस्तुस्थिती जनतेसमोर ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

**'फेक नॅरेटिव्ह' म्हटल्याने जनतेच्या शंका दूर होणार का ?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वृक्षतोडीविषयीच्या आरोपांना 'फेक नॅरेटिव्ह' संबोधले असले, तरी नागरिकांच्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे केवळ राजकीय विधानांतून मिळणार नाहीत. स्वच्छ ऊर्जा आणि पायाभूत सुविधांचा विकास महत्त्वाचा असला, तरी त्यासाठी पर्यावरणावर होणारा परिणाम किती असेल, याचेही शास्त्रीय मूल्यमापन आवश्यक आहे.

## 'फेक नॅरेटिव्ह' म्हणून प्रश्न संपत नाहीत !



**जंगल म्हणजे केवळ झाडे नव्हेत; ती संपूर्ण परिसंस्था आहे!**

भीमाशंकरचे जंगल म्हणजे फक्त हिरवाईने नटलेली डोंगररांग नाही. ते अनेक पशू-पक्ष्यांचे निवासस्थान, जैवविविधतेचा महत्त्वाचा भाग आणि स्थानिक पर्यावरणाचा आधार आहे. जंगलातील झाडांची मोठ्या प्रमाणावर तोड झाल्यास वन्यजीवांच्या हालचालींवर, त्यांच्या अन्नसाखळीवर आणि निवासस्थानांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जंगलाचा ऱ्हास झाल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची प्रक्रिया, मृदासंवर्धन आणि स्थानिक जलप्रवाहांवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पाचे मूल्यमापन करताना केवळ ऊर्जा उत्पादन किंवा आर्थिक फायद्यांचा विचार पुरेसा ठरणार नाही. पर्यावरणीय परिणामांचा स्वतंत्र, शास्त्रीय आणि पारदर्शक अभ्यास होणे गरजेचे आहे.

**उजनीच्या पाणलोट क्षेत्राबाबतही प्रश्न; सोलापूर-पुणे जिल्ह्याचे लक्ष**

भीमाशंकर परिसरातील जंगल आणि जलचक्र यांचा संबंध लक्षात घेता, या भागातील पर्यावरणीय बदलांचा स्थानिक नद्या, ओढे आणि जलस्रोतांवर काय परिणाम होईल, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. उजनी जलाशय सोलापूर जिल्ह्यासाठी शेती, पिण्याचे पाणी आणि विविध आर्थिक व्यवहारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांतील अनेक भागांच्या जलव्यवस्थेशीही हा जलाशय संबंधित आहे.

मात्र, उजनी जलाशय केवळ भीमाशंकरच्या जंगलामुळे भरतो किंवा प्रस्तावित वृक्षतोडीमुळे त्याचा पाणीसाठा निश्चितपणे कमी होईल, असा निष्कर्ष काढण्यासाठी जलवैज्ञानिक अभ्यास आणि ठोस पुरावे आवश्यक आहेत. जंगलतोडीचा पाणलोट क्षेत्रावर संभाव्य परिणाम काय असेल, पावसाचे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण किती बदलेल आणि नदीप्रवाहांवर त्याचा काय परिणाम होऊ शकतो, याचा अभ्यास सार्वजनिक करणे आवश्यक आहे. सोलापूर-पुणे जिल्ह्यांतील शेतकरी, नागरिक आणि पर्यावरणप्रेमींच्या दृष्टीने हा केवळ एका प्रकल्पाचा प्रश्न नसून नैसर्गिक साधनसंपत्तीच्या दीर्घकालीन व्यवस्थापनाचा विषय आहे.

प्रकल्पामुळे किती झाडांवर परिणाम होणार, पर्यायी जागांचा विचार झाला आहे का, वृक्षतोड टाळण्यासाठी कोणते पर्याय तपासले गेले आणि नुकसानभरपाई म्हणून वृक्षारोपणाची कोणती योजना आहे, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

वृक्षतोडीच्या बदल्यात तीनपट क्षेत्रात वृक्षलागवड किंवा पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्याची तरतूद असली, तरी नव्याने लावलेले रोप आणि शंभर वर्षे वाढलेले जंगल यांची तुलना होऊ शकत नाही. जंगल तयार होण्यासाठी दशके लागतात. त्यातील जैवविविधता, जमिनीतील ओलावा, पाण्याचे नैसर्गिक प्रवाह आणि वन्यजीवांचे अधिवास हे केवळ झाडांची संख्या वाढवून तात्काळ निर्माण करता येत नाहीत.

**विकास हवा; पण निसर्गाची किंमत मोजून नव्हे!**

वीज, उद्योग, रस्ते आणि आधुनिक पायाभूत सुविधा या विकासाच्या गरजा आहेत. मात्र, विकासाची संकल्पना केवळ बांधकामे आणि उत्पादनवाढीपुरती मर्यादित ठेवता येणार नाही. पर्यावरणाचे संतुलन बिघडवून साधलेला विकास भविष्यात पाणीटंचाई, जैवविविधतेचा ऱ्हास आणि हवामानविषयक संकटांच्या रूपाने अधिक मोठी किंमत मागू शकतो.

त्यामुळे प्रकल्पाला विरोध करणाऱ्या नागरिकांच्या शंकांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. ग्रामस्थांशी चर्चा, पर्यावरणीय परिणामांचा अहवाल, वृक्षतोडीच्या परवानग्या आणि पर्यायी उपाय यांची माहिती सार्वजनिक केल्यास वादातील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

भीमाशंकरच्या जंगलाचा प्रश्न हा केवळ झाडे तोडण्याचा नाही, तर विकासाचे नियोजन करताना निसगार्ला किती महत्त्व दिले जाते, याची कसोटी आहे. आजची झाडे, जलस्रोत आणि वन्यजीवांचे अधिवास टिकवणे म्हणजे उद्याच्या पिढ्यांच्या जगण्याचा आधार सुरक्षित ठेवणे होय.

'विकासाच्या नावाखाली जंगल उद्ध्वस्त नको; निर्णय पारदर्शक हवा आणि पर्यावरणाचे संरक्षणही हवे,' अशी भावना या मुद्द्यावर व्यक्त होत आहे. प्रकल्पाच्या समर्थकांची भूमिका आणि पर्यावरणाबाबत व्यक्त होणाऱ्या चिंता या दोन्हींची तथ्यांच्या आधारे तपासणी करूनच पुढील निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण विकासासाठी वीज निर्माण करता येईल, नवे रस्ते उभारता येतील; पण शतकानुशतके उभे असलेले जंगल नष्ट झाल्यानंतर त्याची नैसर्गिक समृद्धी पुन्हा निर्माण होण्यासाठी अनेक दशके लागू शकतात.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेवर वर्चस्वासाठी अटीतटीचा सामना रंगणार !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेवर वर्चस्वासाठी जिल्ह्यातील दीग्गज नेत्यांनी व्युहरचना आखली असून. जिल्हा बॅंकेवर वर्चस्वासाठी भाजप नेत्यांनी राजकीय सारीपाटाची रचना करण्यास प्रारंभ केला आहे. जिल्हा बॅंकेच्या कृषी पणन मतदारसंघात सचिन कल्याणशेट्टींच्या २३ नव्या संस्थांचा समावेश झाला. एकूण ११२ मतदारांपैकी २४ संस्थांवर वर्चस्व मिळाल्याने रणजितसिंह मोहिते-पाटलांच्या बालेकिल्ल्यात नवी राजकीय समीकरणे निर्माण झाली आहेत. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचा सर्वांत सुरक्षित आणि कमी मतदार असलेला मतदारसंघ म्हणून कृषी पणन व शेतीमाल प्रक्रिया संस्था मतदारसंघाकडे पाहिले जाते. सोलापूर डीसीसी बॅंकेत सलग तीन टर्मपासून माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील या मतदारसंघातून संचालक झाले आहेत. मोहिते-पाटील यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या



जाणाऱ्या या मतदारसंघात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या २३ संस्थांचा समावेश झाला आहे. एकूण ११२ मतदारांपैकी पूवीर्ची एक आणि नव्याने समाविष्ट झालेल्या २३ अशा २४ संस्थांवर आता आमदार कल्याणशेट्टी यांचे वर्चस्व आहे.कृषी पणन व शेतीमाल प्रक्रिया संस्था मतदारसंघात पूर्वी केवळ अक्कलकोट तालुका खरेदी-विक्री संघ या एकमेव संस्थेचा समावेश होता. अंतिम मतदार यादीत आता अथर्व, अनंत, अनंतचैतन्य, अल्लमप्रभू, एकदंत, कानोसतीमाता, गंगाराम, गुरुमडिवाळेश्वर, टायगर, बुद्धदर्शन, महात्मा बसवेश्वर, यमाईदेवी, रेवणसिद्धेश्वर, लोकमान्य उद्योग समूह, लोकसहमत, विश्वकर्मा, शिऊ, श्रीगणेश, सिद्धरामेश्वर, सम्यक, सोनल, स्वस्तिक आणि हिंगलाज या २३ बहुउद्देशीय सेवा सहकारी संस्थांचा समावेश झाला आहे.या मतदारसंघातून मतदार प्रतिनिधी म्हणून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह मनोज कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी आणि मीलन कल्याणशेट्टी यांचे ठराव झाले आहेत. डीसीसी बॅंकेच्या जागावाटपात ही जागा आमदार कल्याणशेट्टी यांच्याकडे जाण्याची दाट शक्यता आहे. जिल्हा बॅंकेची प्रारूप मतदार यादी जाहीर झाली, त्यावेळी या संस्थांचा समावेश नागरी बॅंका व इतर संस्था मतदारसंघात झाला होता. आपला समावेश पणन संस्था मतदारसंघात करावा, अशी हरकत अक्कलकोटमधील २३ संस्थांनी विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर यांच्याकडे घेतली.या संस्थांच्या वतीने ॲड. उमेश मराठे आणि ॲड. समर्थ दरेकर यांनी बाजू मांडली. या संस्थांची हरकत सहनिबंधकांनी मान्य केली. त्यामुळे डीसीसी बॅंकेच्या अंतिम मतदार यादीत या संस्थांचा समावेश पणन मतदारसंघात झाला आहे.

सहनिबंधकांच्या आदेशान्वये अक्कलकोटच्या २३ संस्थांचा पणन मतदारसंघातील समावेश कायम राहिला आहे. या मतदारसंघात पूर्वी माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे वर्चस्व होते. आता आमदार कल्याणशेट्टी यांचे वर्चस्व निर्माण झाले आहे. दिग्गजांना थक्क करणारी ही खेळी आमदार कल्याणशेट्टी यांनीच खेळल्याचे समोर आले आहे. जिल्हा मध्यवर्ती बॅंकेवर वर्चस्व मीळवण्यासाठी दीग्गज नेत्यांमध्ये अटीतटीचा सामना होत असून जिल्ह्याच्या आगामी राजकारणाची दीशा आणी दशा या निवडणूकीतून स्पष्ट होणार आहे.

# पुणे विभाग पदवीधर व पुणे विभाग शिक्षक मतदार संघांच्या मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषदेसाठी होणाऱ्या पुणे विभाग पदवीधर व पुणे विभाग शिक्षक मतदार संघांच्या



निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया नियुक्त सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी समन्वयाने अचूक, शांततेत आणि ताणरहित पद्धतीने यशस्वी करावी, असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिले.

पुणे विभाग शिक्षक व पदवीधर मतदारसंघांची मतमोजणी मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडीच्या बॅडमिंटन हॉलमध्ये होणार आहे. या अनुषंगाने मतमोजणी कक्षात मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी श्रीमती तेली- उगले म्हणाल्या, मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करण्याचे काम केले आहे. मतमोजणीच्या फेरीदरम्यान शांततेत, चूक होऊ न देता आणि कोणतेही दडपण न घेता काम करावे. व्यवस्थित सर्व नमुने भरून संबंधित पथकाकडे जमा करावेत. नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना आवश्यक तेथे मार्गदर्शन, मदत देण्यात येईल. मतपत्रिका वैध अवैध बाबतचे मुद्दे, आक्षेप योग्यरित्या निकाली काढावेत.

मतपत्रिकांवरील पसंतीक्रमानुसार मतमोजणीची प्रक्रिया असल्याने प्रत्येक टप्प्यावर विशेष काळजी घ्यावी. प्रत्येक टेबलवरील पथकाने काळजीपूर्वक आणि अचूक काम करावे. प्रत्येकाने आपापली जबाबदारी योग्यरित्या पार पाडावी. मतमोजणी प्रक्रियेत टेबलवरील पर्यवेक्षक, सहायक, संबंधित अधिकारी आणि माहिती संकलन करणाऱ्या पथकांमध्ये समन्वय (पान 2 वर..)






# डॉ. सुभाष कन्नी यांच्या 'RAAVAN' चित्रपटातील दोन गाण्यांचे गुरुवारी सोलापूरात अनावरण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हिंदी चित्रपटसृष्टीत पौराणिक कथेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारा 'RAAVAN - THE RISE BEFORE THE FALL' हा आगामी हिंदी चित्रपट सध्या चर्चेत आहे. या चित्रपटातील 'जो हारने से डर गया' आणि 'चलते रहेंगे' या दोन गाण्यांचा विशेष प्रकाशन सोहळा गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील जामश्री सिटी येथील कॉनप्लेक्स सिनेमात आयोजित करण्यात आला आहे. पी. एस. मोशन रील्स आणि सिद्धा आर्ट्स यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती दिग्दर्शक, लेखक डॉ. सुभाष कन्नी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन, संगीत दिग्दर्शन आणि गीतलेखन डॉ. सुभाष कन्नी यांनी केले आहे. पौराणिक पार्श्वभूमी, भव्य दृश्यात्मक मांडणी, प्रभावी संगीत आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही या चित्रपटाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. भारतीय पौराणिक कथांमधील रावण या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे.

**संघर्ष, जिद्द आणि आशावादाचा संदेश**

चित्रपटातील 'जो हारने से डर गया' हे गाणे धैर्य, आत्मविश्वास, संघर्ष आणि पराभवाची भीती न बाळगता पुढे जाण्याची प्रेरणा देणारे आहे. आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी आणि यशासाठी आवश्यक असलेली जिद्द या गाण्यातून अधोरेखित करण्यात आली आहे.

तर 'चलते रहेंगे' हे गाणे सातत्य, आशा आणि प्रतिकूल परिस्थितीतही आपला प्रवास सुरू ठेवण्याची मानवी वृत्ती व्यक्त करते. अडचणी आल्या तरी ध्येयाच्या दिशेने वाटचाल थांबवू नये, हा सकारात्मक विचार या गाण्यातून मांडण्यात आला आहे. दोन्ही गाण्यांचे गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन डॉ. सुभाष कन्नी यांनी केले असून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) साहाय्याने निर्मित स्वरांचा वापर हे या गाण्यांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.




**सोलापूरच्या मातीतून बॉलिवूडपर्यंतचा प्रवास**

डॉ. सुभाष कन्नी हे मूळचे सोलापूरचे असून, त्यांनी बॉलिवूड चित्रपटसृष्टीत लेखन, दिग्दर्शन, संगीत आणि सर्जनशील निर्मिती या क्षेत्रांत काम केले आहे. आपल्या कामाच्या माध्यमातून वेगळी कलात्मक ओळख निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सोलापूरशी असलेले नाते जपत भविष्यात आपल्या प्रॉडक्शन हाऊसच्या माध्यमातून सोलापूर आणि परिसरातील होतकरू कलाकारांना चित्रपटसृष्टीत काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे. अभिनय, संगीत, लेखन आणि चित्रपटनिर्मितीशी संबंधित विविध क्षेत्रांतील स्थानिक प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळावे, तसेच सोलापूरमधील कलाकारांना हिंदी चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचण्याची संधी मिळावी, अशी त्यांची इच्छा आहे.

**पौराणिक कथेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड**

'RAAVAN - THE RISE BEFORE THE FALL' हा केवळ पौराणिक घटनांवर आधारित चित्रपट नसून, सत्ता, महत्त्वाकांक्षा, सामर्थ्य, संघर्ष आणि आत्मपरीक्षण अशा विषयांचा वेध घेणारा हिंदी पौराणिक ॲक्शन थ्रिलर आहे. रावण या व्यक्तिमत्त्वाच्या उदयामागील विचार, त्याची शक्ती, महत्त्वाकांक्षा आणि त्याच्या प्रवासातील संघर्ष यांचा शोध चित्रपटाच्या कथानकातून घेण्यात आला आहे.

या चित्रपटाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे AI-Assisted Hybrid Filmmaking ही संकल्पना. पारंपरिक चित्रपटनिर्मितीच्या पद्धतींसोबत कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आधुनिक साधनांचा वापर करून दृश्यात्मक आणि सर्जनशील अभिव्यक्तीला नवे आयाम देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील तांत्रिक बदलांचा उपयोग करून वेगळी कलात्मक मांडणी प्रेक्षकांसमोर आणण्याचा निर्मात्यांचा मानस आहे.

**चित्रपटप्रेमींसाठी विशेष पर्वणी**

दि. २९ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या विशेष गीते प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने सोलापूरमधील चित्रपटप्रेमींना आगामी हिंदी चित्रपटाच्या संगीतविश्वाची आणि संकल्पनेची ओळख करून घेण्याची संधी मिळणार आहे. या कार्यक्रमाला सोलापूरचे खासदार, आमदार तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या दोन्ही गाण्यांचे प्रकाशन पी. एस. मोशन रील्सच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर करण्यात येणार असून, चित्रपटप्रेमींना ही गाणी ऑनलाइन पाहता आणि ऐकता येणार आहेत.

पौराणिक कथानक, आधुनिक तंत्रज्ञान, स्वतंत्र संगीतनिर्मिती आणि भव्य दृश्यात्मक मांडणी यांचा संगम असलेल्या 'RAAVAN – THE RISE BEFORE THE FALL' या चित्रपटातील दोन गाण्यांच्या प्रकाशन सोहळ्याबाबत सोलापूरमधील चित्रपटप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

या पत्रकार परिषदेस विजयकुमार हत्तुरे, प्रा. काकासाहेब कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# उजनी प्रकल्पांच्या कराराचे अधिकृत माहिती कागदपत्रे जाहीर करा !

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांची शासनाकडे मागणी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरण परिसरातील प्रस्तावित AI डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलर, ग्रीन हायड्रोजन, बॅटरी स्टोरेज व अणुऊर्जा प्रकल्पांबाबत अधिकृत माहिती आणि कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी महाराष्ट्र राज्याच्या उद्योग विभागाकडे केली आहे. शासन आणि JW Global / The Seed Consortium यांच्यातील सुमारे ११.६५ लाख कोटी रुपयांच्या सामंजस्य कराराच्या पार्श्वभूमीवर कंपनीची आर्थिक क्षमता, निधीची उपलब्धता, प्रकल्पांचा पाणी व वीजवापर आणि विविध मंजुरींचा तपशीलवार माहिती मागणी केली आहे. प्रकल्पांमुळे



पाणीटंचाई, पर्यावरणीय नुकसान किंवा अपघात झाल्यास जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित करत नुकसानभरपाई, विमा संरक्षण आणि स्थानिक नागरिकांच्या हितसंरक्षणाबाबतच्या तरतुदी स्पष्ट करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. उजनीची जलसुरक्षा आणि जनहिताच्या दृष्टीने सर्व माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करून द्यावी, असे पत्रात म्हटले आहे.

## संपादकीय

# राजकीय कुरघोड्या

महाराष्ट्राच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोप, सत्तासंघर्ष आणि राजकीय कुरघोड्या या काही नव्या गोष्टी नाहीत. मात्र, मराठा आरक्षणाच्या आंदोलनाशी संबंधित व्यक्ती, सत्ताधारी पक्षातील अंतर्गत संबंध आणि तब्बल ५०० कोटी रुपयांच्या कथित आर्थिक व्यवहाराचा उल्लेख एकाच वेळी समोर येत असेल, तर या प्रकरणाकडे केवळ राजकीय आरोप म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही. मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या सुमारे ३२ मिनिटांच्या ऑडिओ क्लिपमुळे राज्याच्या राजकारणात निर्माण झालेली खळबळ याच कारणामुळे महत्त्वाची ठरते. मात्र, या प्रकरणातील संभाषणाची सत्यता आणि त्यातील दाव्यांची पुष्टी झालेली नसताना कोणालाही दोषी ठरवणे योग्य ठरणार नाही. प्रश्न गंभीर आहे; त्यामुळे तपासही तितकाच गंभीर आणि निष्पक्ष असायला हवा.

### ५०० कोटींचा दावा; राजकीय वर्तुळात संशयाचे ढग

समोर आलेली ऑडिओ क्लिप २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी झालेल्या एका कथित ऑनलाइन बैठकीतील असल्याचे सांगितले जात आहे. या क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांच्यापर्यंत ५०० कोटी रुपये पोहोचवण्याचा दावा एक महिला करत असल्याचे ऐकू येते, असा आरोप करण्यात आला आहे. हा दावा खरा आहे की खोटा, याचा निर्णय केवळ ध्वनिमुद्रण ऐकून होऊ शकत नाही. क्लिपमध्ये फेरफार झाला आहे का, संभाषणाचा संदर्भ काय आहे, संबंधित आवाज कोणाचे आहेत आणि कथित पैशांच्या व्यवहाराला काही स्वतंत्र पुरावा आहे का, या सर्व प्रश्नांची उत्तरे तपासातूनच मिळू शकतात. राजकारणात एखादे विधान किंवा ध्वनिमुद्रण मोठी खळबळ उडवू शकते; परंतु खळबळ म्हणजे पुरावा नव्हे. म्हणूनच या प्रकरणात भावनिक प्रतिक्रिया, राजकीय सोयीचे निष्कर्ष आणि एकमेकांवर चिखलफेक करण्याऐवजी तथ्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

### महायुतीतील अंतर्गत तणाव पुन्हा चव्हाट्यावर?

या प्रकरणाचा राजकीय परिणाम केवळ संबंधित व्यक्तींपुरता मर्यादित राहील, असे मानणे कठीण आहे. महाराष्ट्रात भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना हे सत्तेतील प्रमुख घटक आहेत. दोन्ही पक्षांची राजकीय उद्दिष्टे अनेक बाबतीत समान असली, तरी नेतृत्व, सत्तेतील वाटा, मतदारांवरील प्रभाव आणि आगामी राजकीय समीकरणे यांवरून त्यांच्यात स्पर्धा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेतून बाहेर पडून एकनाथ शिंदे यांनी स्वतंत्र राजकीय भूमिका घेतली आणि मुख्यमंत्रिपदही भूषवले. त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीत भाजपची ताकद वाढल्याने महायुतीतील सत्तासमीकरण बदलली. अशा परिस्थितीत मुख्यमंत्रीपद, पक्षविस्तार आणि राजकीय वर्चस्व यांचे प्रश्न संवेदनशील ठरतात.

याच पार्श्वभूमीवर ऑडिओ क्लिपमधील कथित संभाषण आणि त्यावरून सुरू झालेल्या आरोपांकडे पाहिले जात आहे. शिवसेनेचे मंत्री उदय सामंत आणि नेते रामदास कदम यांनी या आवाजांचा भाजपशी संबंधित व्यक्तींशी संबंध असल्याचा दावा केल्याचे सांगितले जाते. रामदास कदम यांनी या प्रकरणी पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना पत्र पाठवल्याचेही वृत्त आहे. मात्र, आरोप कोण करत आहे, यापेक्षा आरोपांची पुष्टी देणारे पुरावे काय आहेत, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. केवळ आवाज एखाद्या व्यक्तीचा असल्याचा दावा करून त्याची ओळख निश्चित करता येत नाही. त्यासाठी स्वतंत्र ध्वनिमुद्रण तज्ज्ञांची तपासणी, मूळ फाइलची पडताळणी आणि संभाषणाचा संपूर्ण संदर्भ तपासणे आवश्यक आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोरही राजकीय पेच?

महाराष्ट्रातील सत्तासमीकरणे पाहता भाजपचे संख्याबळ आणि राजकीय वर्चस्व महायुतीतील निर्णयप्रक्रियेवर प्रभाव टाकते. त्यामुळे भाजप आणि शिवसेना यांच्यात संशयाचे वातावरण निर्माण झाले, तर त्याचे पडसाद सरकारच्या कामकाजावरही उमटू शकतात. या प्रकरणातून कोणाला राजकीय फायदा होईल आणि कोणाची अडचण वाढेल, याचे आडाखे बांधले जात आहेत. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला या आरोपांच्या पार्श्वभूमीवर आपली भूमिका स्पष्ट करावी लागू शकते. भाजपलाही संबंधित आरोपांबाबत उत्तर द्यावे लागू शकते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठीही या परिस्थितीत राजकीय संतुलन राखणे महत्त्वाचे ठरेल. तथापि, या संपूर्ण प्रकरणामागे मुख्यमंत्र्यांना अडचणीत आणण्याची रणनीती आहे किंवा एखाद्या पक्षाने जाणीवपूर्वक ही क्लिप समोर आणली आहे, असा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढता येणार नाही. राजकीय हेतू असण्याची शक्यता आणि तो सिद्ध झालेली वस्तुस्थिती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. लोकशाहीत सत्ताधारी पक्षांमध्ये मतभेद असू शकतात. मात्र, हे मतभेद गंभीर आरोपांच्या माध्यमातून समोर येत असतील, तर त्यावर पडदा टाकण्याऐवजी पारदर्शक चौकशी होणेच सर्वांच्या हिताचे आहे.

### मराठा आरक्षणाचा लढा पैशांच्या आरोपांत अडकू नये!

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा म्हणजे मराठा आरक्षणाचा लढा. हा लढा केवळ एखाद्या नेत्याच्या राजकीय अस्तित्वाचा विषय नाही. तो आरक्षणाच्या अपेक्षेने आंदोलनात सहभागी झालेल्या लाखो कुटुंबांच्या आशा-आकांक्षांशी जोडलेला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाने राज्याच्या राजकारणावर आणि सामाजिक चर्चेवर मोठा प्रभाव टाकला आहे. या आंदोलनात सहभागी झालेल्या सामान्य नागरिकांच्या मनात आरक्षणाबाबत अपेक्षा आहेत. त्यांना शिक्षण, रोजगार आणि भविष्यातील संधींबाबत ठोस निर्णय हवा आहे. अशा वेळी आंदोलनाशी संबंधित व्यक्तीला ५०० कोटी रुपये मिळाल्याचा कथित दावा समोर येणे ही गंभीर बाब आहे. हा दावा खरा असल्यास त्यासंबंधीचे पुरावे आणि आर्थिक व्यवहारांची माहिती जनतेसमोर यायला हवी. तो खोटा किंवा दिशाभूल करणारा असल्यास तेही स्पष्ट झाले पाहिजे. अन्यथा, अप्रमाणित आरोपांच्या आधारे संपूर्ण आंदोलनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याचा धोका आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नाला राजकीय व्यवहारांच्या चर्चेत अडकवणे कोणाच्याही हिताचे नाही. आंदोलनातील नेतृत्वानेही या आरोपांबाबत उपलब्ध तथ्यांच्या आधारे स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे. त्याच वेळी, आरोप करणाऱ्यांनीही आपल्या दाव्यांना पुष्टी देणारे पुरावे सादर करणे गरजेचे आहे.

### क्लिपची निष्पक्ष चौकशी हाच योग्य मार्ग

या प्रकरणात आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा सत्यशोधनाला प्राधान्य मिळाले पाहिजे. ऑडिओ क्लिपची मूळ प्रत मिळवणे, तिच्यात कोणताही बदल किंवा फेरफार झाला आहे का हे तपासणे, संभाषणातील आवाजांची तज्ज्ञांकडून पडताळणी करणे आणि कथित आर्थिक व्यवहाराबाबत उपलब्ध पुरावे तपासणे आवश्यक आहे. चौकशी करताना कोणताही राजकीय दबाव नसावा. संबंधित व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची संधी मिळावी आणि निष्कर्ष पुराव्यांच्या आधारेच काढले जावेत. क्लिपमधील दावे सिद्ध होण्यापूर्वी त्यांना अंतिम सत्य मानणे जितके चुकीचे आहे, तितकेच गंभीर आरोपांची चौकशीच होऊ न देणेही अयोग्य ठरेल. या प्रकरणात सत्य बाहेर आले, तर संबंधित व्यक्तींची जबाबदारी निश्चित करता येईल. आरोप निराधार ठरले, तर संशयाचे वातावरण दूर होण्यास मदत होईल. दोन्ही परिस्थितींमध्ये पारदर्शक चौकशी हाच लोकशाहीवरील विश्वास टिकवण्याचा मार्ग आहे.

### राजकीय कुरघोड्या थांबणार की नवा संघर्ष सुरू होणार?

महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेसाठी पक्षांतर, नेतृत्वातील स्पर्धा आणि एकमेकांवर आरोप करण्याच्या घटना यापूर्वीही घडल्या आहेत. परंतु प्रत्येक प्रकरणाकडे केवळ कोणाला राजकीय फायदा होईल, या दृष्टिकोनातून पाहणे धोकादायक आहे. कारण त्यातून जनतेच्या मूळ प्रश्नांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. आज राज्यासमोर शेती, बेरोजगारी, शिक्षण, महागाई आणि आरक्षणासारखे अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्याऐवजी राजकीय पक्षांनी परस्परांवरील आरोपांतच वेळ घालवला, तर त्याची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागेल. ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा दावा सत्य असेल, तर त्याचे गांभीर्य कमी लेखता येणार नाही. आणि तो असत्य असेल, तर त्याचा वापर करून एखाद्याची राजकीय प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यताही तपासली पाहिजे. सत्य कोणाच्याही बाजूने असो, ते जनतेसमोर येणे महत्त्वाचे आहे. शेवटी प्रश्न केवळ एका ऑडिओ क्लिपचा नाही; प्रश्न आहे राजकारणातील पारदर्शकतेचा, जनतेच्या विश्वासाचा आणि मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणाऱ्या सामान्य कुटुंबांच्या आशांचा. क्लिपमधील आवाज कोणाचे आहेत, ५०० कोटींच्या दाव्यामागे काही ठोस पुरावा आहे का आणि या संपूर्ण प्रकरणाची पार्श्वभूमी काय आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे. राजकीय आरोपांच्या धुरळ्यात सत्य हरवता कामा नये. कारण सत्तेच्या संघर्षात नेते जिंकतील किंवा हरतील; पण सत्य दडपले गेले, तर नुकसान मात्र लोकशाहीचे आणि सामान्य जनतेच्या विश्वासाचे होईल.

# दुष्काळात श्रीमंतांनी गरिबांना मदत करावी

या वर्षी मराठवाड्यावर पडलेला भीषण दुष्काळ हा अतिशय अक्राळविक्राळ व ऐतिहासिक दुष्काळ म्हणून इतिहासात नोंद झाली आहे. महाराष्ट्राच्या काही भागात थोडाफार पाऊस पडला परंतु मराठवाड्यात एकही मोठा पाऊस पडला नाही. परिणामी मराठवाडा कोरडाठाक पडला आहे. नद्या, नाले, तलाव आणि विहिरी पूर्णपणे आटून गेल्या आहेत. शेतकरी, शेतमजूर आणि कामगार यांच्या हाताला काम मिळत नसल्यामुळे बहुतांश शेतकरी, शेतमजूर आणि कामगार अतिशय चिंताग्रस्त व दुःखी झाले आहेत. आणि आत्महत्या करून स्वतःची जीवन यात्रा संपवत आहेत. थोडाफार पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी शेतात पेरणी केली. परंतु पेरणी केल्यानंतर पावसाने अचानक पाठ फिरवली. एक-दोन सडाके पडले आणि शेतकऱ्यांना सुद्धा वाटू लागले की, आता पाऊस चांगला बरसणार, शेती चांगली पिकणार आणि सुगी सुद्धा जोरात होणार म्हणून शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या होत्या. हल्ली पावसाळा संपून गेला आहे आणि हिवाळ्याला सुरुवात होत आहे. शासनाने यंदा महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. शासनाने शेतकऱ्यांना अजून कोणतीच मदत केली नाही. शासन फक्त शेतकऱ्यांना गाजर दाखवत आहे. केवळ शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना व शेतमजुरांना मनस्ताप झाला आहे. पाऊस न पडल्यामुळे आणि पेरणी करूनही पिके हाताला न आल्यामुळे दररोज कुठे ना कुठेतरी शेतकरी आत्महत्या करतच आहेत. आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या घरी राजकारणी लोक सांत्वनासाठी येतात, आश्वासन देताच आणि चहा पिऊन जातात. परंतु त्यांना आर्थिक दिलासा देण्याचे काम कोणताच राजकारणी करत नाही. आश्वासने देऊन मोकळे होतात पण प्रत्यक्षात मदत काही करत नाहीत, अशा राजकारणी लोकांना खेटराने मारावे लागते. राजकीय लोकांना कळायला हवे की, शेतकऱ्यांनी शेती पिकवली तरच आपल्याला पोटभर खायला मिळणार आहे. ज्या दिवशी शेतकरी शेती पिकवणे बंद करतील त्या दिवशी या देशात उपासमारीची वेळ येईल. म्हणजे शेतकरी जगला तरच शेती पिकणार आहे आणि आपण सर्वजण आनंदाने जीवन जगणार आहोत. म्हणून चित्रपटातील हीरो हीरोइन असतील, राजकीय क्षेत्रातील मोठ-मोठे दिग्गज नेते असतील, कारखानदार, संस्थाचालक आणि मोठमोठे व्यापारी असतील या सर्वांनी विचार करून यावर्षी शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देणे फार पुण्याचे काम होणार आहे. विशेष म्हणजे आता दिवाळी तोंडावर आली आहे. दिवाळीच्या निमित्ताने शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी म्हणून या श्रीमंत लोकांनी गरिबांना धनधान्य, पैसा अडका देऊन त्यांची दिवाळी गोड कशी होईल? याचा विचार करावा. शेतकऱ्यांची, शेतमजुरांची, कामगारांची आणि फूटपाथवर जीवन जगणाऱ्या लोकांची दिवाळी त्यांच्यासोबत मिळून मिसळून साजरी केली तर खरंच आपल्या जीवनात आनंदाचे क्षण नक्कीच येणार आहेत. त्यासाठी श्रीमंतांना माझी विनंती आहे की, यावर्षी शेतकरी अपुऱ्या पावसामुळे तसेच कर्जबाजारी झाल्यामुळे आणि नापिकीला कंटाळून आर्थिक संकटात अडकल्यामुळे अतिशय दुःखी कष्टी जीवन जगत आहेत. त्याला जीवन जगणे नकोसे वाटत आहे म्हणून आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.याला कुठेतरी आळा घालण्यासाठी श्रीमंतांनी एकत्र येऊन शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, कामगारांना आणि फूटपाथवर जीवन जगणाऱ्या लोकांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांना दुःखातून वर काढावे आणि त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण आणावेत हीच श्रीमंतांना माझी विनंती आहे. नाहीतर शेतकऱ्यांनी शेती पिकवायची बंद केली आणि जगावर उपासमारीची वेळ आली तर खऱ्या अर्थाने हा देश विनाशाच्या उंबरठ्यावर असेल हे कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणून दुष्काळात श्रीमंतांनी गरिबांना मदत करणे काळाची गरज आहे. काही राजकीय नेते, चित्रपटातील काही हीरो हीरोइन आत्महत्याग्रस्त कुटुंबाला व शेतकऱ्यांना आर्थिक मदत करून त्यांचे अश्रू पुसत आहेत. आमच्या खंडाळी गावात गजानन नागोराव देमगुंडे या युवकाने कर्जबाजारी, नापिकी आणि दुष्काळाला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केली. यावेळी आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मदत करण्यासाठी खंडाळी चे भूमिपुत्र, सामाजिक कार्यकर्ते तथा युवानेते प्रशांत शिंदे यांनी प्रशासनाला वेळोवेळी पाठपुरावा करून त्यांना आर्थिक मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करत आहेत. प्रशांत शिंदे यांच्या मागणीवरून रिपाई नेते बाबासाहेबजी कांबळे व सामाजिक न्याय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांनी केली आहे. अशा दानशूर व समाज हितासाठी जगणाऱ्या नेत्यांना माझा मनःपूर्वक सलाम! अशा दुष्काळात नटसम्राट नाना पाटेकर यांची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. नाम फाउंडेशन च्या वतीने नाना पाटेकर यांनी दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यात नाना आघाडीवर असायचे. त्यांच्या पाठोपाठ मकरंद अनासपुरे हे देखील सामाजिक बांधिलकी म्हणून समाजकार्य करण्यात नानाच्या पाठोपाठ आर्थिक मदत करण्यात त्यांचा देखील सिंहाचा वाटा होता. आज नाना नाहीत पण त्यांची आठवण कायम स्मरणात राहील. नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची प्रेरणा घेऊन प्रत्येक श्रीमंतांनी शेतकऱ्यांना शेतमजुरांना व कामगारांना आर्थिक दिलासा देऊन त्यांना दुष्काळाच्या झळा बसू न देणे ही सध्या काळाची गरज आहे.

**-बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

# हंगाम 2025-26 साठी जिल्ह्यात प्रति टन रू.3125/- उच्चांकी दर- बबनराव शिंदे

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचे सन 2025-26 गळीत हंगामामध्ये गळीतास आलेल्या ऊसाचा दिवाळीसणासाठी अंतिम हप्ता प्रति टन रू.100/-प्रमाणे सभासद, बिगरसभासद व ऊस पुरवठादार शेतक-यांचे बँक खात्यात जमा करणेत आला असल्याची माहीती संस्थापक अध्यक्ष मा.आ.बबनराव शिंदे यांनी दिली.



अधिक माहीती देताना मा. आ.शिंदे म्हणाले की, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे युनिट नं.1 पिंपळनेर व युनिट नं.2 करकंब या कारखान्याचा सन 2025-26 गळीत हंगाम बंद झालेला असून या हंगामात युनिट नं.1 कडे 15 लाख 54 हजार 562 मे.टन गाळप होवून 10 लाख 33 हजार 900 क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झाले आहे. तसेच युनिट नं.2 कडे 5 लाख 24 हजार 451 मे.टन गाळप होवून 4 लाख 86 हजार 150 असे एकूण 20 लाख 79 हजार 013 मे.टन ऊसाचे गाळप होवून 15 लाख 20 हजार 050 क्विंटल साखर पोती उत्पादीत झाली आहेत.

सन 2025-26 गळीत हंगामामध्ये दोन्ही युनिट कडे गाळपास आलेल्या ऊसास यापुर्वी प्रति मे.टन रू.3025/- प्रमाणे पहीला हप्ता अदा केला आहे. या हंगामात गाळपास आलेल्या ऊसासाठी दिवाळीकरीता अंतिम हप्ता प्रति टन रू.100/-प्रमाणे ऊस पुरवठादार शेतक-यांचे बँक खात्यात जमा करणेत आला असून सन 2025-26 हंगामासाठी एकूण ऊस दर प्रति टन रू.3125/-होत असून जिल्ह्यात उच्चांकी दर ठरला आहे. प्रति टन रू.100/-प्रमाणे बिलासाठी एकूण रू.20 कोटी 79 लाख अदा करणेत आले आहेत.

कारखान्याचा सन 2026-27 गळीत हंगाम सुरू असून कारखान्याकडे ऊस तोडणी वाहतूक करणाऱ्या व ऊस पुरवठादार शेतकऱ्यांनी आपला सर्व ऊस विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे दोन्ही युनिटकडे गाळपास देवून सहकार्य करावे असे आवाहन आ.बबनराव शिंदे यांनी केले. सदरप्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन पोपट गायकवाड, कार्यकारी संचालक, जनरल मॅनेजर व इतर अधिकारी उपस्थित होते.

# अष्टविनायक नगरला प्रणितीताईंचा आधार; ८.४७ लाखांचा सभामंडप मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील जुळे सोलापूर परिसरातील अष्टविनायक नगर सह. गृह. संस्था, म्हाडा कॉलनी येथे तब्बल २५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सभामंडपाचे भूमिपूजन झाले. खा. रणरागिणी प्रणितीताई शिंदे यांच्या खासदार स्थानिक विकास निधीतून सन २०२६-२७ अंतर्गत ८ लाख ४७ हजार २५० रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.




सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूरच्या देखरेखीखाली हे काम होणार असून कामाचा प्रारंभ आदेश सप्टेंबर २०२६ मध्ये देण्यात आला आहे.

**चेअरमन विश्वनाथ व्हनकोरे यांचा आक्रमक घणाघात -**

यावेळी प्रास्ताविक करताना चेअरमन विश्वनाथ व्हनकोरे यांनी सर्व पक्षीय नेत्यांचा पदार्फाश केला.

ते म्हणाले, "संस्था स्थापन होऊन २५ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या २५ वर्षात प्रभाग २४ जुळे सोलापूर, दक्षिण सोलापूर मतदारसंघातील सर्व पक्षीय आमदार, खासदार, नगरसेवक, महापौरांना निवेदन दिले, दारोदार फिरलो, पण कोणीही एक दमडी दिली नाही. सर्वांनी आमच्या सोसायटीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. आज आम्हाला आनंद आहे की, खा. प्रणितीताई शिंदे यांनी शब्द नाही तर कृती केली - खासदार फंडातून १० लाखाचा निधी उपलब्ध करून दिला."

सोसायटीच्या वतीने त्यांनी प्रणितीताईंचे जाहीर आभार मानले.

**भूमिपूजन सोहळा थाटात -**

खासदार प्रणितीताई शिंदे यांचा सत्कार ॲड. देवयानी यांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला. त्यानंतर प्रणितीताईंच्या हस्ते सभामंडपाचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा पार पडला.

या सोहळ्यास सोसायटीचे सचिव व्यंकटेश वैकुंठे, खजिनदार सुभाष सदाफुले, ज्येष्ठ संचालक मोहन डांगे, मारुती कटारे, गौरीशंकर जेऊरे, सुनील सुरवसे, संचालिका रेखा गायकवाड, महिला बचत गटाच्या अध्यक्षा सोनम कोळी, संध्या जाधव, उषा व्हनकोरे, तसेच माळगे, कटारे, भुतनळी, तिर्थ, घाडगे, पाटील, पवार, सुरवसे, कुलकर्णी, ढगे यांचे सह कुटुंबीय आणि अष्टविनायक गणेश मित्र मंडळाचे कार्यकर्ते व स्नेहल पार्क येथील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सभामंडपामुळे आता अष्टविनायक नगरवासीयांना सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काची जागा मिळणार आहे.

# रब्बी हंगाम 2026-27 अंतर्गत फळपीक विमा भरण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना रब्बी हंगाम 2026-27 अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील अधिसूचित फळपिकांसाठी विमा योजना राबविण्यात येत आहे. हवामानातील प्रतिकूल बदलांमुळे फळबागांचे होणारे संभाव्य नुकसान लक्षात घेता, शेतकऱ्यांनी आपल्या फळबागांचा विमा विहित मुदतीत उतरवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत डाळिंब, आंबा, पपई व केळी या फळपिकांचा समावेश असून, प्रत्येक पिकासाठी स्वतंत्र हवामान ट्रिगर, विमा संरक्षणाचा कालावधी व हवामान निकष निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये अवकाळी पाऊस, कमी तापमान, जास्त तापमान, जास्त पाऊस तसेच वेगवान वारे यांसारख्या हवामान धोक्यांचा समावेश आहे. संबंधित पिकासाठी निश्चित केलेल्या कालावधीत हवामान निकषांची पूर्तता झाल्यास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विमा संरक्षण लागू होते.

डाळिंब पिकासाठी विमा भरण्याची अंतिम मुदत 14 जानेवारी 2027 असून, शेतकरी विमा हप्ता प्रति हेक्टर 8 हजार रुपये आहे. राज्य शासनाचा हिस्सा प्रति हेक्टर 28 हजार रुपये व केंद्र शासनाचा हिस्सा 20 हजार रुपये असून, एकूण विमा हप्ता प्रति हेक्टर 56 हजार रुपये आणि विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर 1 लाख 60 हजार रुपये आहे. या पिकासाठी हवामान ट्रिगरनुसार विमा संरक्षणाचा लाभ घेता येणार आहे.

आंबा पिकासाठी विमा भरण्याची अंतिम मुदत 31 डिसेंबर 2026 आहे. या पिकासाठी शेतकरी विमा हप्ता प्रति हेक्टर 8 हजार 500 रुपये, राज्य शासनाचा हिस्सा 29 हजार 750 रुपये आणि केंद्र शासनाचा हिस्सा 21 हजार 250 रुपये आहे. एकूण विमा हप्ता प्रति हेक्टर 59 हजार 500 रुपये असून, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर 1 लाख 70 हजार रुपये आहे.

पपई पिकासाठी विमा भरण्याची अंतिम मुदत 31 ऑक्टोबर 2026 आहे. शेतकरी विमा हप्ता प्रति हेक्टर 2 हजार रुपये, राज्य शासनाचा हिस्सा 3 हजार रुपये आणि केंद्र शासनाचा हिस्सा 3 हजार रुपये आहे. एकूण विमा हप्ता प्रति हेक्टर 8 हजार रुपये असून, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर 40 हजार रुपये आहे.

केळी पिकासाठीही विमा भरण्याची अंतिम मुदत 31 ऑक्टोबर 2026 आहे. या पिकासाठी शेतकरी विमा हप्ता प्रति हेक्टर 8 हजार 500 रुपये, राज्य शासनाचा हिस्सा 21 हजार 250 रुपये आणि केंद्र शासनाचा हिस्सा 21 हजार 250 रुपये आहे. एकूण विमा हप्ता प्रति हेक्टर 51 हजार रुपये असून, विमा संरक्षित रक्कम प्रति हेक्टर 1 लाख 70 हजार रुपये आहे.

फळपीक विमा योजनेअंतर्गत प्रत्येक पिकासाठी हवामान ट्रिगरचे निकष व संरक्षण कालावधी वेगवेगळे आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या पिकासाठी लागू असलेले हवामान निकष, ट्रिगर कालावधी आणि संबंधित महसूल मंडळातील अधिसूचनेची माहिती नजीकच्या कृषी कार्यालयातून प्राप्त करून घ्यावी. विमा अर्ज भरताना पिकाचे क्षेत्र, आवश्यक कागदपत्रे व इतर माहिती अचूक नोंदवावी.

# सोलापूर शहर हद्दीत मनाई आदेश लागू

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर अश्विनी पाटील, यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 37 चे उप कलम (1), (2) व पोटकलम (3) याद्वारे दिनांक 22 ऑक्टोबर 2026 रोजी 00. 01 वाजले पासून ते दिनांक 05 नोव्हेंबर 2026 रोजीचे मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत या कालावधीसाठी पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत खालील गोष्टींना प्रतिबंधित करण्यात येत आहे .

शस्त्रे, अग्निशस्त्रे, बॅटन, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, विना परवाना बंदुका, चाकु, काठ्या किंवा लाठ्या किंवा इत्तर कोणतीही वस्तू जी शारिरीक हानी (हिंसा) करण्यासाठी वापरली जाऊ शकते अशी हत्यारे बाळगणे ज्या अधिका-याने परवाना दिला असेल किवा सक्षम प्राधिका-याकडुन अशी शस्त्रे वाहुन नेण्यासाठी विशिष्ट परवानगी मागितली असेल अशा बंदुकासाठी बगळता.

कोणताही पदार्थ किंवा स्फोटके वाहून नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा उपकरणे किवा क्षेपणास्त्रे टाकण्याची किंवा प्रक्षेपित करण्याची स्वधने, वाहून नेणे, गोळा करणे आणि तयार करणे, व्यक्ती किंवा प्रेत किंवा आकृती किंवा पुतळे यांचे प्रदर्शन, सार्वजनिक टिकाकरण उच्धार गाणी गाणे संगीत वाजवणे,

सोलापूर शहरात तैनात असलेल्या कोणत्याही पोलीस अधिका-याच्या मते शालीनता किंवा शिष्टाचाराच्या विरोधात असणारी चित्रे चिन्हे फलक किंवा इतर कोणतीही वस्तू किंवा वस्तू तयार करणे प्रदर्शन करणे किंवा प्रसारीत करणे जेणे करून सामाजिक नैतिकता किंवा सुरक्षा धोक्यात येईल किंवा राज्य उलथुन टाकणेस कारणीभुत ठरू शकेल.

जर कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही वस्तूसह सशस्त्र जात असेल किंवा अशा प्रतिबंधाचे उल्लघन करत कोणताही उपरोधक पदार्थ किंवा स्फोटक किंवा क्षेपणास्त्र घेवून जात असेल तर तो/ती कोणत्याही पोलीस अधिका-या मार्फत निशस्त्र होण्यास जबाबदार असेल किंवा त्याच्याकडून संक्षारक पदार्थ किंवा स्फोटक किंवा क्षेपणास्त्र जप्त करण्यास जबाबदार असेल त्यांचे कडील जप्त केलेली वस्तू उपरोधिक पदार्थ स्फोटक किंवा क्षेपणास्त्र राज्य सरकारकडे जमा करणेत येईल.

हा आदेश कोणत्याही सरकारी किंवा सरकारी उपक्रमाच्या सेवेत किंवा नोकरीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्याच्या वरिष्ठांना किंवा त्याच्या कर्तव्याच्या स्वरूपानुसार शस्त्रे बाळगण्यासाठी लागु होणार नाही, हा आदेश खाजगी सुरक्षा रक्षक किंवा गुरखा किंवा चौकीदार इत्यादीना लागु होणार नाही. जे 3 १/२ फुट लांबीपर्यंतच्या लाठ्या बाळगत आहेत.

पान १ वरून

# पुणे विभाग पदवीधर व...

असणे आवश्यक असल्याचे श्रीमती तेली-उगले यांनी सांगितले. निवडणूक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान आपल्या शंकांचे निरसन करून घ्यावे. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही संदिग्धता राहू नये, यासाठी आवश्यक नियम, सूचना आणि कार्यपद्धतींचा अभ्यास करावा, असेही त्या म्हणाले. यावेळी अपर जिल्हाधिकारी तथा महाऊर्जाचे अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर यांनी शिक्षक मतदार संघातील मतमोजणी अधिकारी कर्मचाऱ्यांना आणि सह आयुक्त संजय पलांडे यांनी पदवीधर मतदार संघातील अधिकाऱ्यांना मतमोजणीशी संबंधित बाबींचे सविस्तर प्रशिक्षण दिले. मत मोजणी प्रक्रियेत सहभागी अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या शंकांचे श्री. पलांडे व श्री. आनंदकर यांनी निरसन केले.

यावेळी मतमोजणीची प्रक्रिया निर्धारित नियमांनुसार, वेळेत आणि काटेकोरपणे पार पाडण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणात विविध बाबी स्पष्ट करण्यात आल्या. मतपेट्या उघडणे, ५० मतपत्रिकांचे गठ्ठे तयार करणे, भरायचे विविध नमुने, मतपत्रिका वैध, अवैध अचूक वर्गीकरण करणे, प्रत्येक फेरीनुसार निकाल नमुना जमा करणे आदींसह मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया यांचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण देण्यात आले. मतमोजणीसाठी करण्यात आलेल्या सर्व सुविधा व नियोजनाची माहिती यावेळी देण्यात आली.

**अशी होणार मतमोजणी:**

पदवीधर मतदार संघाच्या मतमोजणीसाठी १०० टेबल असणार आहेत. यासाठी ५ कक्षात प्रत्येकी १० टेबलच्या २ रांगा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

शिक्षक मतदार संघाच्या मतमोजणीसाठी ४२ टेबल असणार आहेत. यासाठी ३ कक्षात प्रत्येकी ७ टेबलच्या २ रांगा अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, दोन मतमोजणी सहायक आणि एक शिपाई असा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आला आहे.

# निवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुरेश ननवरे यांचे निधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मूळचे दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथील आणि सध्या सोलापुरातील मड्डी वस्ती, भवानी पेठ येथे वास्तव्यास असलेले निवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुरेश मारुती ननवरे (वय ७३) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने आकस्मिक निधन झाले. सोमवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली.



ननवरे यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस दलात सेवा बजावली होती. पोलीस उपनिरीक्षक पदावरून ते निवृत्त झाले होते. त्यांच्या निधनाने नातेवाईक आणि परिचितांमध्ये शोक व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुली, एक मुलगा आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा मुलगा सध्या अमेरिकेत आहे.

त्यांची अंत्ययात्रा बुधवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता मड्डी वस्ती, भवानी पेठ येथील त्यांच्या राहत्या घरापासून निघणार असून, रुपाभवानी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## वात्रटिका

### राजकीय भाष्य

ज्यांनी जे बोलू नये ते
अभद्र बोलू लागले...
नेत्यांचे ऐकून चेले सुद्धा
बाष्कळ बडबडू लागले...
सुसंस्कृत राजकारणाचा
चेहरा कधीच हरवला...
नेत्यांच्या पावलावर पाऊल
ठेवून चेल्यांनी कित्ता गिरवला...

**हणमंत पडवळ**
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शेतकऱ्यांची ऊसबिले थकवणाऱ्या साखर कारखान्यांना गाळप परवाना नाही!



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** शेतकऱ्यांची ऊसबिले थकवणाऱ्या आणि आरआरसी (महसूल वसुली प्रमाणपत्र) कारवाईला सामोरे जाणाऱ्या साखर कारखान्यांना चालू गाळप हंगामासाठी कोणत्याही परिस्थितीत परवाना दिला जाणार नाही, अशी ठाम भूमिका साखर सहसंचालक किरण गायकवाड यांनी घेतली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची देणी थकविणाऱ्या कारखान्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

सोलापूर विभागात २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामासाठी २५ ऑक्टोबरपर्यंत एकूण ३१ साखर कारखान्यांनी गाळप परवाने घेतले आहेत. काही कारखान्यांच्या अर्जामध्ये त्रुटी असल्याने त्यांचे परवाने अद्याप प्रलंबित आहेत. मात्र, आरआरसी कारवाई सुरू असलेल्या आणि शेतकऱ्यांची थकीत ऊसबिले पूर्णपणे न दिलेल्या कारखान्यांना परवाना देण्यास सहसंचालकांनी स्पष्ट नकार दिल्याचे सांगण्यात येत आहे.

### सिद्धेश्वर, संत कूर्मदास कारखाने अडचणीत

मागील गाळप हंगामात सिद्धेश्वर साखर कारखाना (कुमठे) आणि संत कूर्मदास साखर कारखाना (माढा) यांच्यावर आरआरसी कारवाई करण्यात आली होती. उपलब्ध माहितीनुसार, सिद्धेश्वर कारखान्याकडे सुमारे ३३ कोटी रुपये, तर संत कूर्मदास कारखान्याकडे सुमारे १३ कोटी रुपयांची ऊसबिले थकीत होती. या कारखान्यांनी काही शेतकऱ्यांची देणी अदा केली असली, तरी सर्व शेतकऱ्यांची थकबाकी पूर्णपणे मिळालेली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे उर्वरित ऊसबिले अदा न केल्यास या कारखान्यांच्या चालू हंगामातील गाळप परवान्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

### गोकुळ कारखान्याच्या थकीत बिलांचा प्रश्न ऐरणीवर

धोत्री येथील गोकुळ साखर कारखान्याने मागील हंगामात ऊसबिले अदा न केल्यामुळे गाळप परवाना न घेताच गाळप केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात प्रशासनाने कारखान्याला ३० कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या हा कारखाना ओंकार ग्रुपच्या ताब्यात असून, महसूल प्रशासनाच्या स्तरावर आरआरसी कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात येते.

ओंकार ग्रुपकडून अद्याप गाळप परवान्यासाठी मागणी करण्यात आलेली नसल्याची माहिती आहे. मात्र, जुन्या थकीत देण्यांचा प्रश्न निकाली निघेपर्यंत कारखान्याला परवाना दिला जाणार नसल्याची भूमिका प्रशासनाने घेतल्याचे स्पष्ट होत आहे.

### शेतकरी संघर्ष समितीकडून निर्णयाचे स्वागत

शेतकरी संघटना आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर सहसंचालक किरण गायकवाड यांच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. गोकुळ कारखान्याकडील २०२३-२४ आणि २०२४-२५ या गाळप हंगामांतील थकीत ऊसबिले तसेच कर्मचाऱ्यांचे पगार मिळावेत, यासाठी अद्याप संघर्ष सुरू असल्याचे शेतकरी संघर्ष समितीकडून सांगण्यात आले.

'आमच्या घामाचा दाम दिल्याशिवाय ओंकार ग्रुपच्या गोकुळ कारखान्याला गाळप परवाना देऊ नये,' अशी आक्रमक मागणी शेतकरी संघर्ष समितीचे अमोल पाटील यांनी केली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांची थकीत देणी वेळेत मिळावीत, यासाठी प्रशासनाने घेतलेली ही भूमिका महत्त्वाची मानली जात आहे. आता संबंधित कारखाने थकीत ऊसबिले अदा करून आवश्यक अटींची पूर्तता करतात का आणि त्यांना गाळप परवाने मिळतात का, याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# मिशन सुधार अंतर्गत बंद केलेली ४,७७७ रेशन कार्डे पूर्ववत करून लाभार्थ्यांचा धान्यपुरवठा सुरू करा - खा प्रणिती शिंदे



**मंगळवेढा, (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढा तालुक्यात मिशन सुधार योजनेंतर्गत बंद करण्यात आलेली सुमारे ४,७७७ रेशन कार्डे पूर्ववत करून लाभार्थ्यांना नियमित धान्यपुरवठा सुरू करावा, तसेच रेशन कार्डधारकांच्या विविध समस्या तातडीने सोडवाव्यात, या मागणीसाठी खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवेढा तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी आंदोलन करण्यात आले. दामाजी चौकातून तहसील कार्यालयावर मोर्चा काढून कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात रेशन कार्डधारक महिला व पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मिशन सुधार योजनेंतर्गत तालुक्यातील सुमारे ४,७७७ रेशन कार्डे बंद करण्यात आल्याने अनेक गरीब, गरजू व सर्वसामान्य कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मिळणाऱ्या अन्नधान्यापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच रेशन कार्ड उपलब्ध असूनही काही लाभार्थ्यांना नियमित धान्य मिळत नाही, तर रेशन मिळण्यास पात्र असलेल्या अनेक कुटुंबांना अद्याप रेशन कार्ड मिळालेले नाही. या गंभीर प्रश्नाबाबत खासदार प्रणितीताई शिंदे यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनही प्रश्न मार्गी न लागल्याने काँग्रेसच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.

दामाजी चौकातून काढण्यात आलेल्या मोर्चामध्ये सहभागी नागरिकांनी शासनाविरोधात घोषणाबाजी करत तहसील कार्यालय गाठले. यानंतर कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून बंद करण्यात आलेली रेशन कार्डे तातडीने पूर्ववत करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनाच्या मागण्यांचे निवेदन पुरवठा निरीक्षक नवनाथ चव्हाण यांना देण्यात आले.

यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, यंदा दुष्काळाची तीव्रता असताना अशा परिस्थितीत रेशन कार्डधारकांचा धान्यपुरवठा बंद करणे अन्यायकारक आहे. सरकारला शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि रेशन कार्डधारकांच्या अडचणींची जाणीव नाही. सध्याची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बंद केलेला धान्यपुरवठा तातडीने पूर्ववत करावा. अन्यथा जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यासंदर्भात खासदार प्रणिती शिंदे यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, संबंधित प्रकरणांची प्रत्यक्ष चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे म्हणाले की, तालुक्यात अद्याप जनावरांसाठी चारा छावण्या सुरू झालेल्या नाहीत, तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत नागरिकांचा धान्यपुरवठा बंद करणे चुकीचे असून, शासनाने सध्याच्या परिस्थितीचा गांभीयार्ने विचार करून तातडीने दिलासा द्यावा.

राज्य सचिव रवीकरण कोळेकर म्हणाले कोणतेही शहानिशा न करता व कार्डधारकांना विश्वासात न घेता या सरकारने हे केलेले काम म्हणून हा निषेध आम्ही यांचा करत आहोत.

रेशन कार्डे पूर्ववत करून नियमित धान्यपुरवठा सुरू करणे, पात्र लाभार्थ्यांना रेशन कार्ड उपलब्ध करून देणे आणि रेशन कार्डधारकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करणे, या मागण्या यावेळी करण्यात आल्या. जोपर्यंत अन्यायग्रस्त रेशन कार्डधारकांना न्याय मिळत नाही आणि त्यांचा धान्यपुरवठ्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार मंगळवेढा काँग्रेसच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

या आंदोलनात मंगळवेढा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रशांत साळे, प्रदेश काँग्रेसचे सचिव ॲड. रविकिरण कोळेकर, मंगळवेढा शहराध्यक्ष ॲड. राहुल घुले, ॲड. दत्तात्रय खडतरे, नाथा ऐवळे, अर्जुन पाटील, सत्तार इनामदार, ज्ञानेश्वर सोरडीकर, महिला तालुकाध्यक्ष आयेशा शेख, अभिमन्यू तात्या बेद्रे, बजरंग चौगुले, दामाजी सलगर, आबा पाटील, अण्णासाहेब शिरसागर, शिवदास पुजारी, सुरेश चव्हाण, महादेव साखरे यांच्यासह तालुक्यातील रेशन कार्डधारक महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ सादर करण्याचे आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सन 2026-27 या शैक्षणिक वर्षापासून महाडीबीटी 2.0 प्रणाली कार्यान्वित करण्यात आली असून, सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी अनुसूचित जाती प्रवगार्तील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांसाठीचे नवीन व नूतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरून घेऊन मंजुरीसाठी सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येत आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी महाविद्यालयांनी विशेष शिबिरांचे आयोजन करून सन 2026-27 या शैक्षणिक वषार्साठी पात्र विद्यार्थ्यांचे नवीन (Fresh) व नूतनीकरण (Renewal) अर्ज महाडीबीटी 2.0 प्रणालीवर तातडीने भरून घ्यावेत. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेले अर्ज व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून महाविद्यालयीन स्तरावरील कार्यवाही पूर्ण करावी आणि पात्र अर्ज पुढील मंजुरीसाठी जिल्हा कार्यालयाकडे सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज अद्याप भरलेले नाहीत किंवा अर्जामध्ये त्रुटी आहेत, अशा विद्यार्थ्यांशी महाविद्यालयांनी त्वरित संपर्क साधून अर्ज पूर्ण करून घ्यावेत. कोणताही पात्र विद्यार्थी आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे किंवा अजार्तील त्रुटीमुळे शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. तरी, सोलापूर जिल्ह्यातील सर्व संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी या बाबीस सर्वोच्च प्राधान्य देऊन अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे नवीन व नूतनीकरणाचे अर्ज तात्काळ भरून घेऊन मंजुरीसाठी सादर करावेत, असे आवाहन, सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीम. सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

# गोपाळपूर ग्रामपंचायतीचे स्वतः चे आपले वाचनालय



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** गावात स्पर्धा परिक्षे बरोबर इतर ग्रामस्थांना वाचनाची आवड निर्माण होणे साठी गोपाळपूर ग्रामपंचायने स्वतः चे आपले वाचनालय सुरू केले आहे.

आज गोपाळपूर येथे यशदा पुणे नवनियुक्त अधिकारी (CPTP-12) व ग्रामपंचायत गोपाळपूर यांच्यामार्फत ग्रामपंचायत मध्ये "आपलं वाचनालयाच" उदघाटन करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत हा उपक्रम राबविणेत येत आहे.

वाचनालयासाठी यशदा पुणे तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी पुस्तकं भेट दिली.

यावेळी यशदाचे उप महा संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, गटविकास अधिकारी पंचायत समिती पंढरपूर अमोल जाधव, कुलकर्णी विषय तज्ञ यशदा कचरे समन्वयक यशदा तांबोळी एस आर प्रशासक गोपाळपूर सचिन जाधव जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक तसेच सर्व प्रशिक्षनार्थी क्षितिज पाटील- डी वाय एस पी, नितीन आसबे - गटविकास अधिकारी, अमित नंदेश्वर -गटविकास अधिकारी, आशिष गायकवाड- वित्त व लेखाधिकारी,

सुमित कानडे -वित्त व लेखाधिकारी, शक्तीसिंह कार्वेकर- सहाय्यक राज्यकर, आयुक्त अनिरुद्ध चव्हाण-सहाय्यक राज्यकर आयुक्त तसेच सर्व शिक्षक अंगणवाडी सेविका आशा ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### यशदाचे दिली ५० पुस्तकांची भेट..!

यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी ने ५० पुस्तके तर गटविकास अधिकारी अमोल जाधव यांनी देखील ५० पुस्तके भेट दिली. गावातील अंगणवाडी सेविका या देखील पुस्तके भेट देऊन आपलं वाचनालय सिध्द करून दाखविले आहे. प्रशिक्षणार्थी अधिकारी यांनी ५० पुस्तकांचा संच ग्रामपंचायतीस भेट दिला. ग्रामविकास पंचायत अधिकारी ज्योती पाटील यांचे कडे हे संच सुपूर्द करणेत आले.

# सिंहगड इन्स्टिट्यूटच्या बास्केटबॉल संघाला विद्यापीठस्तरीय स्पर्धेत तृतीय पारितोषिक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बास्केटबॉल संघाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेत तृतीय पारितोषिक पटकावले. सांगोला महाविद्यालय, सांगोला येथे २२ व २३ सप्टेंबर २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धेत संघाने उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशाबद्दल सिंहगड इन्स्टिट्यूटचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. रवींद्र व्यवहारे यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा समन्वयक प्रा. योगेश शेटे यांच्या मार्गदर्शनामुळे खेळाडूंना स्पधेर्साठी प्रोत्साहन मिळाले.

महाविद्यालयात शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासालाही प्राधान्य दिले जात असून, या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा टप्पा जोडला गेला आहे.

## जाहीर नोटीस

क्रि. कि. अर्ज नं. १६७/२०२६

**मोहोळ येथील श्रीमती एस. जे. पेंडे सा० प्रथमवर्ग न्यायदंडा कोर्ट क्रं. ३ यांचे न्यायालयात**

चंदाबाई अशोक कुंभार, रा. अर्जुनसोंड, ता. मोहोळ, जि. सोलापूर. } **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रामपंचायत सय्यद वरवडे, ता. मोहोळ } **सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार नाव चंदाबाई अशोक कुंभार अर्जुनसोंड, ता. मोहोळ स्वत: चे. वडील नामे धर्मा महादेव कुमार याचा/ मृत्यु दि २५ / ६/१९९३ रोजी मौजे. सय्यद वरखडे ता. मोहोळ जि. सोलापुर येथे झाला असल्याने तशी/मृत्यु उशीराची नोंद/ग्रा . प/मौजे सय्यद वरवडे ता. मोहोळ जि. सोलापुर यांच्या/मृत्यु नोंदणी रजिस्टरला योग्य ती फी आकारुन करणेचा मे. कोर्टाचा संबंधीत नोंदणी अधिकारी यांना हुकुम व्हावा याबददल या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी कळिवण्यात येते की, ज्या कुणास सदर अर्जाबाबत म्हणणे हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत स्वत: अगर वकिलामार्फत हजर राहुन आपली हरकत नोंदवावी अन्यथा सदरकामी कोणती हरकत नाही असे समजुन मे. कोर्टा चौकशीची कारवाई सुरु करुन जरुर वर योग्य तो आदेश प्रदान करेल याची नोंद घ्यावी. आज दिनांक .२६ / १० /२०२६

(शिक्का)

**हुकुमावरुन**
**सहा.अधिक्षक**
**फौजदारी न्यायालय, मोहोळ**

# दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत द्या

### रयत क्रांतीचे जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील शेतकरी सध्या आर्थिक संकटाचा सामना करत असून, दुष्काळी परिस्थिती आणि शेतीसमोरील विविध अडचणींमुळे बळीराजा अडचणीत सापडला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने दिवाळीपूर्वी ठोस आर्थिक मदत जाहीर करून तिची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी रयत क्रांती संघटनेचे सोलापूर जिल्हाध्यक्ष नामदेव पवार यांनी केली आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शासनाने मदतीबाबत केवळ घोषणा करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर द्यावा, असे पवार यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या सर्व समस्यांवर पाच हजार रुपयांची मदत हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नसला, तरी संकटाच्या काळात ही रक्कम शेतकऱ्यांना मोठा आधार देऊ शकते. त्यामुळे मदतीच्या निर्णयात विलंब न करता त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**शेतकऱ्यांचा संयम पाहू नका!**

शेतीचा वाढता खर्च, आर्थिक अडचणी आणि नैसर्गिक संकटांचा सामना करताना शेतकऱ्यांची परिस्थिती दिवसेंदिवस कठीण होत आहे. अशा वेळी शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना वेळेत मदत देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होण्यापूर्वी शासनाने योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन नामदेव पवार यांनी केले.

दरम्यान, जिल्ह्यातील साखर कारखानदारांची बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत पार पडल्याचेही समोर आले आहे. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि त्यांच्या आर्थिक हिताचे संरक्षण व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. ऊसदराचा प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेता शासनाने कारखानदारांशी चर्चा करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणीही महत्त्वाची ठरत आहे.



शेतकऱ्यांना केवळ आश्वासनांवर अवलंबून न ठेवता प्रत्यक्ष मदत मिळणे, हीच काळाची गरज आहे. त्यामुळे शासन आता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर कोणती ठोस पावले उचलणार, याकडे जिल्ह्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

**— नामदेव पवार,** जिल्हाध्यक्ष, रयत क्रांती संघटना

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**

**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**

**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) छ. शिवरायांवर आधारित रणजित देसाई लिखित कादंबरी २) कलर (मराठीत) ३) प्राथमिक शालेय पुस्तकांचे प्रकाशन करणारी संस्था ४) फळातील गोड द्रव ५) एक औषधी लाल रंगाचे कंदमूळ ६) बोलावण्यासाठीची आरोळी ७) धावपट्टू (इंग्रजीत) ८) भाजप नेते रावसाहेब दानवे या जिल्ह्यातील आहेत ११) पडीक जमीन १२) ग्राम, खेडे १३) लोक, रयत १५) श्रीगणेशाचे एक नाव १७) गुणाकारच्या विरूध्दार्थी शब्द १८) वत उलट लिहा २०) स्वभावाने रागीट २२) विषमच्या विरूध्दार्थी शब्द २४) रक्तवाहिनी २६) शिर्डी येथील प्रसिध्द देवस्थान २७) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** २९) डांबरी रोड ३०) फिरकी गोलंदाज-यजुवेंद्र *** ३२) उत्सवाचा दिवस ३४) धांदल, गडबड ३५) कर्ज (इंग्रजीत) ३६) भाजप नेत्या-उमा *** ३८) शर्ट ३९) ब्रेड (मराठीत) ४१) मध्य मुंबईतील एक रेल्वे स्टेशन, जिना ४२) अफूप्रमाणे एक अंमली पदार्थ ४३) झाडाचे पर्ण ४४) जय-पराजय, हार-** ४५) प्रख्यात दिवंगत गायिका-** मंगेशकर ४७) याच्यापासून शिरा बनवितात

**आडवे शब्द :** १) शिवसेनेचे महाराष्ट्रातील एक खासदार ५) लालूप्रसाद मुख्यमंत्री होते ते राज्य ९) शोध, तपास १०) सल उलट लिहा ११) लगेच, लवकर १२) फळातील मुख्य गर १३) एक म्हण-नाकापेक्षा मोती ** १४) नव्वदच्या दशकातील एक अभिनेत्री-*** टंडन १६) देवतांनी दिलेला आशिर्वाद १७) शिजवलेला तांदूळ १९) श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेशपर ग्रंथ-भगवत ** २१) आ. सुमनताई पाटील यांचा विधानसभा मतदारसंघ २३) नय उलट लिहा २५) ओंजळ २८) याचे कणीस भाजून खातात २९) सत्वयुक्त, पौष्टीक ३०) बसण्यासाठी ही अंथरतात ३१) सक उलट लिहा ३३) लहानपण ३५) संसदेचे एक सभागृह ३७) बगिचा ३८) घर, निवास ४०) इराकची राजधानी ४२) गव्हाच्या पिठापासून बनवितात ती गोल *** ४४) प्राणप्रिय मित्र, जवळचे नाते ४६) दोघांमध्ये पडलेले अंतर, भेग (हिंदीत) ४८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ४९) एक हिंदी चित्रपट-** मचाये शोर, चोऱ्या करणारा ५०) वडिलार्जित संपत्तीचा हक्कदार ५१) उन्हाळ्यातील एक महिना

## सुडोकु - 85

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | 7 | | 1 | | | 6 |
| | | | 6 | 9 | | | 1 | |
| | 9 | 6 | | 8 | | | 5 | 3 |
| 9 | 8 | 4 | | | | | | |
| 2 | | | | | | 6 | 4 | |
| 6 | | 3 | | | 5 | 8 | | |
| | 7 | 8 | | 1 | 4 | 9 | | |
| 4 | 2 | | 3 | 6 | 7 | | | 5 |
| 5 | | 1 | | | 9 | 3 | | 4 |

